| MHKO140003882010 | नियमित दिवाणी दावा क्र. १२५/२०१०<br>**राणबा दत्तु पाटील**<br>**वि.**<br>**दत्तु कल्लाप्पा पाटील आणि इतर** |
|---|---|

**<u>निशानी क्रमांक ६५ वरील आदेश</u>**

**(दिनांक ११/०७/२०२५)**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.अ, ब आणि क यांनी विलंब माफ होवून त्यांच्या विरुद्ध पारित लेखी जबाब नाहीचा आदेश रद्द होवून लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्यासाठी दि.०१/०८/२०२२ रोजी पर्यंतची मुदत देण्यात आली होती. पंरतु प्रतिवादी क्र.१ अ वयोवृदध असल्यामुळे आणि प्रतिवादी क्र.१ ब सैन्य दलामध्ये नोकरीला असल्यामुळे आणि प्रतिवादी क्र.१ क हे अशिक्षित असल्यामुळे त्यांना मुदतीच्या आत लेखी जबाब सादर करण्याबाबत माहिती नव्हती. त्यामुळे कैफियत सादर करण्यास विलंब झालेला आहे. न्यायाच्या कारणास्तव विलंब माफ होवून प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. वादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी अर्जास म्हणणे सादर करुन योगय तो आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द कायम मनाई मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी मुदतीच्या आत कैफियत सादर केलेली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द लेखी जबाब नाहीचा आदेश पारित झालेला आहे. परंतु प्रतिवादी

यांनी प्रस्तुत अर्जासोबत त्यांचा लेखी जबाब दाखल केला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये अचल संपत्तीबाबत न्यायनिर्णय होणार असुन दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण दाव्यामध्ये सुनावणी सुरु झालेली नाही. प्रकरणात गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी देणे नैसर्गिक न्याय तत्वाच्याआधारे आवश्यक व न्यायोचित आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांचेविरुद्ध पारित विना लेखी जबाब आदेश रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2025.07.14 17:07:06 +0530

दि.११/०७/२०२५

**(वामन डी. जाधव)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड**